सकाळ TODAY
कोल्हापूर, सोमवार, १३ ऑक्टोबर २०२५ ७

# ‘विद्यापीठ’, ‘विवेकानंद’ला विजेतपद

## विभागीय बुद्धिबळ स्पर्धा : डीकेटीई, विवेकानंद, भारती कॉलेजचेही यश

■ सकाळ वृत्तसेवा

गडहिंग्लज, ता. १२ : भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठांतर्गत विभागीय पुरुष व महिला बुद्धिबळ स्पर्धा उत्साहात झाल्या. पुरुष गटात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने, तर महिला गटात विवेकानंद महाविद्यालयाच्या (कोल्हापूर) संघाने विजेतपद पटकावले.

स्पर्धेचा अन्य निकाल असा : पुरुष गटात डीकेटीई इचलकरंजी द्वितीय, तर विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले. महिला गटात द्वितीय डी.के.टी.ई. इचलकरंजी व भारती अभियांत्रिकी महाविद्यालय कोल्हापूरने तृतीय क्रमांक पटकावला.



**भडगाव** : विद्यापीठ विभागीय बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन महेश कोरी यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. डी. व्ही. घेवडे, डॉ. नीलेश पाटील, सागर शिंदे आदी उपस्थित होते.

स्पर्धेचे उद्घाटन दिनकरराव के. शिंदे स्मारक ट्रस्टचे सल्लागार महेश कोरी यांच्याहस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे होते. झोनल क्रीडा सचिव डॉ. नीलेश पाटील प्रमुख पाहुणे होते. एकूण ११८ स्पर्धकांनी या स्पर्धेत उत्साहाने सहभाग नोंदविला. विविध वरिष्ठ महाविद्यालयांचे शारीरिक शिक्षण संचालक तसेच इचलकरंजी चेस ॲकॅडमीच्या सदस्यांनी स्पर्धेचे नियोजन केले. डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे शारीरिक संचालक सागर शिंदे यांनी स्पर्धेचे संयोजन केले.

यावेळी कोरी म्हणाले, ‘स्पर्धा ही खिलाडू वृत्तीने खेळली पाहिजे. कारण खेळ आपल्याला जीवनातील चढउतारांचा सामना करण्याचे धडे देतात.’ प्राचार्य डॉ. घेवडे यांचेही भाषण झाले. प्रा. शरद किल्लेदार यांनी सूत्रसंचालन केले.

13-10-25

हॅलो प्रभात

# व्यावसायिक क्षेत्रामध्ये 'इंग्रजी भाषेचे महत्त्व' वर व्याख्यान संपन्न

कोल्हापूर : हॅलो प्रभात

आधुनिक युगात कोणत्याही व्यावसायिक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी इंग्रजी भाषेचे कौशल्य अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन सायबर कॉलेजच्या तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. सुनिता दलवाई यांनी विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित व्याख्यानात केले. बी.एस्सी. कॉम्प्यूटर सायन्स (एंटायर) व इंग्रजी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. दलवाई यांनी इंग्रजी ही केवळ भाषा नसून यशाची गुरुकिल्ली असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना संवादकौशल्य व तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी इंग्रजीचे ज्ञान आवश्यक असल्याचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे



प्रास्ताविक प्रा. माधुरी पवार यांनी केले, स्वागत प्रा. पल्लवी देसाई यांनी केले. आभार प्रदर्शन कु. भूमी चौगुले हिने केले. सूत्रसंचालन कु. श्वेता पाटील आणि कु.संकेत पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. डॉ.कविता तिवडे, डॉ.श्रुती जोशी, रजिस्ट्रार एस.के.धनवडे यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.